# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH Internet : www.dte.org.in


क्रमांक : १६/आस्था/२०११/ ६९
दिनांक : 27/10/2011

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय : शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मशाळेत कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांनी पार पाडावयाचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या.
संदर्भ : या संचालनालयाचे परिपत्रक क्रमाक : १६/आस्था/२०११/५७, दिनांक १४.१०.२०११

तंत्रशिक्षण संचालनालयात शासनाचे प्रतिनिधी, संचालनालयाचे अधिकारी व विविध संघटनाचे प्रतिनिधी यांच्याशी दिनांक १२.१०.२०११ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत वरील संदर्भिय परिपत्रकान्वये शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मशाळेत कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासनाकडून अंतिम होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रसिध्द केलेल्या आहेत. तथापि, कर्मशाळेतील तांत्रिक कर्मचारी, सदर कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे पालन करीत नसल्याचे दिसून आलेले आहे त्यांची सदर कृती नियमबाह्य आहे.

शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मशाळेत कार्यरत असलेले तांत्रिक कर्मचारी वरील संदर्भिय दिनांक १४.१०.२०११ च्या परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे पालन करीत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी सर्व कर्मचाऱ्यांनी तात्काळ कामकाज सुरु करावे अन्यथा सदर कर्तव्यांत कसूर केल्याच्या दिनांकापासून त्यांची विनावेतन रजा धरण्यांत येऊन सदरचा कालावधी सेवेतील खंड का धरण्यांत येऊ नये याबाबतचा संबंधित कर्मचाऱ्यांकडून खुलासा संबंधित प्राचार्यांमार्फत घेऊन त्याबाबतचा एकत्रित अहवाल आपल्या अभिप्रायासह या संचालनालयास सादर करावा.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

**अतितात्काळ**

**पृष्ठांकन क्र.विकाऔ/आस्था-३/२०११/** ८९९
दिनांक :- 25 OCT 2011

प्रति,
प्राचार्य, शासकीय **अभियांत्रीकी/औषधनिर्माणशास्त्र** महाविद्यालय, **औरंगाबाद**
प्राचार्य,सर्व **शासकीय तंत्रनिकेतने,**

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील कर्मशाळेत कार्यरत तांत्रिक कर्मचा-यांचे **कर्तव्य व जबाबदा-यांचे पालन करण्याबाबतचा अहवाल** आपल्या **अभिप्रायासह या कार्यालयास तात्काळ** सादर करण्यात यावा.

**सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

C:\Deepak\Asta3\CERCULAR\DSS\25102011\13